# Certificate of Publication

is awarded to

निलेश हलामी

for the paper titled

## आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विकास विभागाचे शिक्षणातील योगदान

Published in *Drishtikon* Journal Vol-11, Issue-05 Year 2019 ISSN: 0975-119X

International Refereed and Indexed Journal for Research Publication

With Impact Factor 5.1 UGC Care Listed

*S.N. Sharma*

Editor-In-Chief

editor@hindijournals.org

UGC

University Grants Commission

EDUINDEX

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL

Adarsh Arts & Commerce College,

Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

**Drishtikon***(Bimonthly Hindi Journal)*
ISSN 0975-11
Vol-11-Issue-
September-Octobe

# आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विकास विभागाचे शिक्षणातील योगदान

डॉ.राजविलास कारमोरे
सहयोगी प्राध्यापक
विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपुर जि.वर्धा

निलेश हलामी
सहायक प्राध्यापक
आदर्श महाविद्यालय,देसाईगंज जि.गडचि

**गोषवारा–**

आदिवासी हा पूर्णपणे मागासलेला जंगला–रानात वास करून राहात असलेला समाज असल्याने त्यांचा सर्वांगीन विकास घडवून आणण्याकरिता शासनाने त्यांचा सामाजिक, आ शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी वेगवेगळया योजना राबविल्या आहेत. प्रस्तुत शोध नि आदिवासी विकास विभागातंर्गत आदिवासींकरिता राबविण्यात येत असलेल्या शिक्षणाच्या यो तसेच त्यांच्या स्वरूपाचे अध्ययन करण्यात आले. तसेच भारतातील व महाराष्ट्र राज्यातील आदिव साक्षरतेचे अभ्यासातंर्गत असे दिसून आले की,भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी वि विभागातंर्गत आदिवासींकरिता राबविण्यात येत असलेल्या शिक्षणाच्या योजनामुळे आदिवा साक्षरतेचे प्रमाण वाढत असतांना दिसुन येते.

**मुख्य शब्द** : आदिवासी लोकसंख्या, शिक्षण योजना, आदिवासी साक्षरता

**प्रस्तावना –**

भारतीय राज्य घटनेच्या 45 कलमान्वये प्राथमिक शिक्षण हे सर्व मुला–मुलींना मोफ सक्तीचे देण्याची जबाबदारी राज्य सरकार व जिल्हा परिषदेवर आहे. आदिवासी क्षेत्रातील शि मोठया प्रमाणात आश्रम शाळेतून होत असतांना दिसून येते. महाराष्ट्र शासनाने आदिवासी ज लोकवस्ती असलेल्या भागात त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी खास आश्रम शाळा सुरू करण्याची 1953 मध्ये शासकिय निर्णय क्र.1653 (21/12/1953) नुसार प्रारंभ केली. महाराष्ट्र राज आदिवासी क्षेत्रातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी सन 1972 मध्ये आदिवासी संचालनालयाची स्थापना केली गेली. सन 1972 पासून महाराष्ट्र राज्य शासनाकडून आश्रमशाळा योजनेची अंमलबजावणी करण्यात येऊ लागली. योजनेचा मुख्य उद्देश डोंगराळ व दुर्गम, राना राहणाऱ्या आदिवासी लोकांची आर्थिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी शासकिय आश्रमशाळा सुरु होता. अनुसूचित जमातीच्या मुला–मुलींसाठी महाराष्ट्र राज्यात सन 1953 पासून आश्रमशा योजना राबविण्यात येत आहे. ही योजना महात्मा गांधी यांच्याकदून प्रेरणा घेवून ठक्कर बाप्प सर्व प्रथम महाराष्ट्रात सुरू केली.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासींच्या शिक्षणात आश्रमशाळेची एक महत्वाची भूमिका आ 2015–16 च्या महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभागाच्या माहिती पुस्तकेनुसार, मह

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

महाराष्ट्र राज्यातील आदिवासींच्या सर्वांगीन विकासासाठी सन 1972 मध्ये आदिवासी f संचालनालयाची स्थापना शासनाने केली. आदिवासी उपयोजनेची अधिक यशस्वीपणे अंमलब होण्याची दृष्टीने समाज कल्याण विभागाने शासनाने विभाजन करून सन 1983 मध्ये मंत्रा स्तरावर स्वतंत्र ''आदिवासी विकास मंत्रालयाची'' स्थापना केली. या स्थापनेनंतर र आदिवासीकरिता दरवर्षी विविध योजना राबविण्यात येत आहेत.

आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्र होण्याच्या दृष्टीने 1992 मध्ये या विभागाची पुनर्रचना करण्यात आली. राज्यात आयुक्त, आ विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे अधिपत्याखाली अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, अमरावती व नागपुर आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प 29 का कार्यरत आहेत.

समाजातील कमकुवत घटकांपैकी आदिवासी घटक अत्यंत दुर्बल असून, भारतीय घ कलम 46 खाली समाजाच्या दुर्बल घटकांच्या आणि विशेषतः अनुसूचित जाती व जमाती शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक हितसंबंधांकडे विशेश लक्ष देऊन त्यांचा विकास करण्याकरिता त्यांना सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून संरक्षण देण्यासाठी शासनाने स्तरांवर सतत प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**संशोधनाचे उद्देश :**

1. महाराष्ट्र राज्यातील आदिवासींची लोकसंख्याचा अभ्यास करणे.
2. आदिवासी विकास विभागातंर्गत आदिवासींकरिता राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक यो अभ्यास करणे.
3. आदिवासी विकास विभागातंर्गत आदिवासींकरिता राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक यो स्वरूपाचे अभ्यास करणे.
4. आदिवासींच्या साक्षरता प्रमाणाचे अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

या शोध निबंधात व्दितीयक सामग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे. ज्यात प्रमुख्याने ग्रंथ,नियत कालिका,सरकारी विभिन्न अहवाल,वेबसाईट यांचा आधार घेतला गेला आहे.

**आदिवासी लोकसंख्या :**

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र 3,07,713 चौ.कि.मी. एवढे असून त्यापैकी 50,757 चौ. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण 16.5 टक्के एवढे होते. गेल्या पाच दश राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी पुढिल प्रमाणे.

| जनगणना वर्ष | राज्याची एकुण लोकसंख्या (लाखात) | आदिवासी लोकसंख्या (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1971 | 504.37 | 38.41 | 7.62 |
| 1981 | 627.84 | 57.72 | 9.19 |

Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

ISSN 0975-11
Vol-11-Issue-
September-Octobe

महाराष्ट्र राज्यातील आदिवासींच्या लोकसंख्याचा मागील पाच दशकाचा विचार केल्यास जनगण 1971 ते 1991 पर्यंत लोकसंख्या वाढतांना दिसतो. परंतू जनगणना वर्ष 2001मध्ये लोकसंख्या झालेली दिसतो. 2011च्या जनगणनेनुसार आज राज्यामध्ये आदिवासींची लोकसंख्येचे प्रमाण 9.35

**आदिवासी विकास विभागाच्या शैक्षणिक योजना :**

आदिवासी विकास विभागातंर्गत पुढिल प्रमाणे शैक्षणिक योजना राबविल्या जातात.

**अ) शालेय शिक्षण :–** शालेय शिक्षणातंर्गत येणाऱ्या योजना

**1. शासकीय आश्रमशाळा :**

महाराष्ट्र राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांची सा व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सन 1972–73 पासून क्षेत्र विकासाच्या दृष्ठीकोन स्वीकारण्यात अ असून अशा भागाचा मूलभुत विकास व्हावा आणि त्याचा फायदा सर्वांना व्हावा, यासाठी येथ केंद्रस्थान म्हणून आश्रमशाळा निर्माण करण्यात आल्या. या शाळेत आदिवासा विद्यार्थ्यांची इ.10व पर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध असते.सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास,भोजन,गणवेश,अ पांघरूण,पुस्तके व इतर लेखन साहित्य इत्यादी सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात.

**2. अनुदानित आश्रमशाळा :**

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभागाने 1953–54 पासून राज्यात अनु आश्रमशाळांना परवानगी देण्याचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार अनुसूचित जमातीच्या विद्या इयत्ता 1 ली ते 12 वी पर्यंत विनामुल्य शिक्षण दिल्या जाते. सेवाभावी स्वेच्छा संस्थेने अनु आश्रमशाळेस परवानगी मिळाल्यापासून 2 वर्षात इमारत बांधकाम करावे. प्रत्येक वर्गात किमा निवासी व 10 बहिस्थ विद्यार्थी असावे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास आश्र प्रयत्न करतात. वरील सुविधा पुरविण्यासाठी प्रती विद्यार्थी प्रतिमहा रू 900 याप्रमाणे परिरक्षण अ देण्यात येते तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्याचा खर्च शासनामार्फत करण्यात येतो.

**3. एकलव्य रेसिडेन्सियल पब्लिक स्कूल :**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने नवव्या पंचवार्षिक य भारतीय संविधानाच्या कलम 275(1) अन्वये वितरीत होणाऱ्या निधीतून आदिवासी विद्यार्थ राज्यस्तरावर निवासी शाळा स्थापन करण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत आ विद्यार्थ्यांना इंग्रजीमधून शिक्षण मिळावे याकरिता एकलव्य रेसिडेन्सियल पब्लिक स्कूल निवासी ही केंद्रपुरस्कृत योजना राबविली जात आहे. अशा शाळेत इयत्ता 6वी ते 12वी पर्यंत सी.बी अभ्यासक्रमानुसार शिक्षण देण्यात येते.

**4. इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा :**

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील सामाजि शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा,या उद्देशाने सन 2003– वर्षापासून जिल्हयाच्या ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरू करण्यात आले आहे.

**5. शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकीत निवासी शाळा :**

महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातीतील साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे उच्च शि प्रामुख्याने इंग्रजीचा वापर जास्त होत असल्याने अनुसूचित जमातीचे विद्यार्थी उच्च शिक्षणात मा आहेत व उच्च शिक्षणाच्या बदललेल्या वातावरणात त्यांना जळवून घेणे कठीण होत

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

ISSN 0975-11
Vol-11-Issue-
September-Octobe

झाले आहे. यासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना राबविण्यात येत आहे.

**6. सैनिकी शाळा :**

राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना सैनिकी शाळेमध्ये शिक्षण देण्यासाठी इयत्ता 5वीच्या व मुलांच्या सैनिकी शाळेमध्ये 45 आदिवासी मुलांना, मुलींच्या सैनिकी शाळेमध्ये 45 आदिवासी आणि ज्या सैनिकी शाळेत सह शिक्षणाची मान्यता देण्यात आलेली आहे अशा सैनिकी शाळेम आदिवासी मुले व 23 आदिवासी मुली यांना प्रवेश देण्यात येत आहे. अशा सैनिकी शाळेत विद्या निवास व्यवस्था, भोजन, गणवेश,अंथरून,पांघरून,पुस्तके,लेखन साहित्य इत्यादी सुविधा मोफत आहेत.

**7. आश्रमशाळा मध्ये क्रिडा स्पर्धा :**

क्रीडा व युवक संचालनालया प्रमाणेच आदिवासी विकास विभागाकडून आश्रमशाळेतील 19 या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी प्रकल्पस्तर, विभागीयस्तर व राज्यस्तरावर विविध क्रीडा आयोजन केले जाते.सदर खेळ प्रकारात सांघिक व वैयक्तिक स्पर्धा घेण्यात येतात. शालेय शि क्रीडा विभागाच्या दि.22 एप्रिल,2015 च्य शासन निर्णयान्वये आदिवासी विभागाने आयोजित राज्यस्तरावर शालेय क्रीडास्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना 25 वाढीव गुण देण्यात येतात. सदर स्पर्धेत पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत नोकरीसाठी ठेवलेल्या 5 टक्के आर फायदा मिळतो.

**8. विद्यार्थी व शिक्षकांना संगणक प्रशिक्षण :**

राज्यातील शासकिय आश्रमशाळांमधील इयत्ता 5वी ते 12वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमावर आधारित प्रशिक्षण देण्याची उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे सुरूवात करण्यात असुन सदर प्रशिक्षण देण्याकरिता नामांकित खाजगी संगणक प्रशिक्षण संस्थेची निवड करण्य निवड झालेल्या संस्थांनी त्यांचे संस्थेमार्फत संगणक तज्ज्ञाची नियुक्ती करून प्रत्यक्ष आश्रम मुख्यालयी जावून तसेच संस्थेची स्वतःचे संगणक संच शाळेच्या संगणक कक्षामध्ये सुरू करून देण्याची सुरूवात करण्यात येते.

**10. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र :**

अनुसूचित जमातीमधील बहुतांश मुले–मुली नोकरीसाठी आवश्यक असलेली किमान प्राप्त करीत आहेत. तथापि आदिवासी वस्ती असलेला भाग हा डोंगराळ व दुर्गम असल्यामुळे व प्रतिकुल परिस्थितीमुळे या आदिवासी युवकांना व्यवसाय प्रशिक्षणाच्या सुविधा पुरेशा प्रमाणात करून देण्यात येत आहे.

**11. इयत्या 10व 12वी मधील गुणवत्ता प्राप्त शाळांना विशेष प्रोत्साहनात्मक बक्षिस :**

आदिवासी विकास विभागांतर्गत विभागीयस्तरावर चालविण्यात येणाऱ्या शासकिय व अ आश्रमशाळांना विशेश प्रोत्साहनपर बक्षीसे देण्याची योजना शासन निर्णय दि.14 ऑगस्ट, 200 सुरू करण्यात आली आहे. ज्या शासकिय व अनुदानित आश्रमशाळा आदिवासी भागामध्ये अ विद्यार्थ्यांकरिता उत्कृष्ट काम करतात त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी सदर योजना राबविण्यात

**12. इयत्या 10व 12वी मधील गुणवत्ता प्राप्त मुलांना विशेष प्रोत्साहनात्मक बक्षिस**

आदिवासी विकास विभागांतर्गत विभागीयस्तरावर इयत्ता 10वी व 12वीत अनुसूचित

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणच्या दृष्टीने स्थलकालानुरूप आवश्यक आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात किंवा केंद्रीय निधीतून राबविण्यात येणाऱ्या योज नाही अशा अभिनव स्वरूपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना,तात्रिक औपचारिकतेमुळे कालावधीकरिता अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने आणि प्रभावीपणे कार्यान्वित त्यांचा लाभ गरजू आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा योजनेचा गाभा आहे. उदा. पात्रता विक नोकर भरती स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण राबविणे.

**ब) वसतिगृह :–** वसतिगृहातंर्गत पुढिल योजना राबविल्या जातात.

**1. शासकीय वसतिगृह :**

अनुसूचित जमातीच्या मुला मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक व्हावी या उद्देशाने सदर योजना सुरू करण्यात आली आहे.शासकिय वसतिगृहात गुणवततेनुसार देऊन त्यांना निवास,भोजन,आंथरूण,पांघरूण,पाठयपुस्तके,शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक मोफत पुरविण्यात येते.तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाहभत्ता अदा करण्यात येते.

**2. पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयम् योजना :**

अनुसूचित जमातीच्या शासकिय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना इयत्त नंतरच्या उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न खात्यामध्ये थेट रककम वितरण करण्याबाबत " पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयम्" योजन 2016–17 पासून राबविण्यात येत आहे.

**क) शिष्यवृती, फी व निर्वाह भत्ता :–** शिष्यवृती, फी व निर्वाह भत्ता खालील प्रकारे दिले जातात

**1. भारत सरकार शिष्यवृती :**

आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर उच्च शिक्षणाकरीता प्रोतसाहीत करण्याच्या दृ त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागविता यावा म्हणून भारत सरकारव्दारे ही योजना राबविली जाते.

**2. सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृती :**

इयत्ता 1ली ते 10वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याचा श तसेच इतर किरकोळ खर्च भागविण्यासाठी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शि योजना शैक्षणिक वर्ष 2010–11 पासून लागू करण्यात आली आहे.

**3. परदेशी शिक्षण / शिष्यवृती :**

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठात उच्च शिक्षणासा घेतलेल्या विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना 2 यावर्षापासून सुरू करण्यात आलेली आहे.

**4. शिक्षण शुल्क,परिक्षा शुल्क अदा करणे :**

ज्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न 2 लाखापेक्षा जास्त असल्य सरकार शिष्यवृत्ती करिता अपात्र ठरल्याने असे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये निर्वाहभत्यासह फक्त शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क अदा करण्यात येतात.

**5. व्यावसायिक पाठयक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे. :**

उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस सर्वसाधारण शिक्षण अभ्यासक्रमापेक्षा ज येतो त्यामळे बरेच विद्यार्थी खर्चीक व्यावसायिक शिक्षण घेण्यास तयार होत नाही

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist. Gadchiroli

**Drishtikon***(Bimonthly Hindi Journal)*

ISSN 0975-11
Vol-11-Issue-
September-Octobe

अपंग व्यक्तिंच्या अडचणी लक्षात घेवून त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा हेतू लक्षात घे शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच त्यांना इतरांच्या बरोबरीने स्पर्धा करून शासनामार्फत मि फायदे मिळावेत आणि त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी याकरिता शासनाने सन 2003–04 या शै वर्षापासून अनुसूचित जमातीच्या इयत्ता 8वी ते 12वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शि व वाहतूक भत्ता देण्यात येतो.

**7. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करणे :**

मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेय वैद्यकीय व संलग्न शिक्षणाकरिता खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना शै शुल्काची प्रतिपूर्ती करणे.

**ड) इतर शैक्षणिक योजना :**

**1.पुस्तक पेढी योजना :**

वैद्यकीय,अभियांत्रिकी,कृषी,पशुवैद्यकीय,तंत्रनिकेतन,एल.एल.बी.व एम.बी.ए. या अभ्यासक्रमा लागणाऱ्या पुस्तकांची संख्या जास्त व खूप महाग असलयामुळे विद्यार्थ्यांना पुस्तके खरेदी करण्या महाविद्यालयांना रक्कम मंजूर करण्यात येते.

**आदिवासी साक्षरता :**

स्वातंत्र्योत्तर काळाचा विचार केल्यास आदिवासीचे साक्षरतेचे प्रमाण फार कमी होते. डोंग दुर्गम भागात वास्तव्य करण्याऱ्या आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना राबवि आले.सोबतच शैक्षणिक योजना राबवित असल्यामुळे भारतातील व महाराष्ट्र राज्यातील आदि साक्षरतेचे प्रमाण वाढतांना दिसुन येते.

**भारतातील व महाराष्ट्र राज्यातील आदिवासींची साक्षरता प्रमाण**

| जनगणना वर्ष | भारतातील आदिवासींची साक्षरता प्रमाण | महाराष्ट्र राज्यातील आदिवासींची साक्षरता प्रमाण |
|---|---|---|
| 1961 | 8.53 | 7.21 |
| 1971 | 11.30 | 11.74 |
| 1981 | 16.35 | 22.29 |
| 1991 | 29.60 | 36.79 |
| 2001 | 47.10 | 55.2 |
| 2011 | 59.00 | 65.7 |

देशातील व महाराष्ट्र राज्यातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण मागील सहा दशकाचा विचार के जनगणना वर्ष 1961 ते 2011 पर्यंत आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण वाढतांना दिसतो.

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

**निषर्क :–**

आदिवासी हा पूर्णपणे मागासलेला जंगला–रानात वास करून राहात असलेला समाज

ISSN 0975-11
Vol-11-Issue
September-Octobe

संदर्भसूची :–

1. आदिवासी विकास प्रशासन–डॉ.एस.जी.देवगांवकर ,श्री साईनाथ प्रकाशन,नागापूर.

2. माहिती पुस्तिका–महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग सन 2015–16.

3- https://tribal.maharashtra.gov.in

4- https://trti.maharashtra.gov.in/index.php/en/statewise-total-tribal-population

5- https://www.census2011.co.in/scheduled-tribes.php

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli